सोमवार, दि ६ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ६ वा ● किमंत २ रु. ● पाने ४   RNI: MAHMAR/2013/50827   8390098886   yuva.aadarsh@gmail.com   8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/   https://youtube.com/@Yuva_Aadarsh/   https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# सरकारची मराठा-ओबीसी ऐक्याला धक्का देणारी भूमिका - डॉ. संजय लाखे पाटील

## उपसमितीला पडताळणीचा अधिकार नाही

**जालना । प्रतिनिधी -** मराठा आरक्षण आणि काल मुंबईत मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या ओबीसी नेत्यांच्या बैठकीनंतर राज्यात नव्या राजकीय समीकरणांना आणि तणावाला खतपाणी घालणारे वक्तव्य समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्राचे मुख्य समन्वयक डॉ. संजय लाखे पाटील यांनी आज (दि. ५ ऑक्टोबर २०२५) दुपारी ४ वाजता आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत राज्य सरकारवर गंभीर आरोप केले.

डॉ. लाखे पाटील म्हणाले की, सरकारचा कारभार आग्या मोहळला दगड मारल्यास तो दगड मरणाऱ्यांनाही चावतो, अशा पद्धतीने सुरू आहे. सत्ताधाऱ्यांकडून समाजात जाणूनबुजून तणाव निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

ते पुढे म्हणाले की, ओबीसी उपसमितीला कुणबी प्रमाणपत्रांच्या पडताळणीचा अधिकार नाही.

राज्याचे मंत्री बावनकुळे यांनी ओबीसी उपसमिती प्रमाणपत्र पडताळणी करेल असे विधान केले, मात्र असा कोणताही अधिकार त्यांच्या कडे नाही. 'माधुरी पाटील प्रकरणा'नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विशिष्ट कायदे आणि मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. पडताळणी प्रक्रियेला ठराविक न्यायिक चौकट आहे, त्यात मंत्री हस्तक्षेप करू शकत नाहीत, असे डॉ. लाखे पाटील यांनी स्पष्ट केले.

सरकार जातीय तणाव भडकवत आहे - आरोप लाखे पाटील यांनी सरकारवर आरोप करताना म्हटले की, राज्य सरकार निवडणुका समोर ठेवून समाजात फूट पाडण्याचे राजकारण करत आहे. राज्यात ओला दुष्काळ, शेतकऱ्यांचे प्रश्न, आणि रोजगाराच्या समस्या असताना, लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी जातीय वाद छेडले जात आहेत.

ते पुढे म्हणाले की, राज्य सरकारमधील काही मंत्री कायदा आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण करणारे वक्तव्य करत आहेत. यामुळे समाजात परस्पर वैरभाव वाढण्याची शक्यता आहे. सरकारने असा समाजविघातक कारभार थांबवावा.

सरकारने सर्व समित्या रद्द कराव्यात. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षते खाली शांतता समिती बनवावी, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना त्यात घ्यावे व अशावेळी सर्वांना एकत्र बोलावून निर्णय घेणे आवश्यक आहे.

ओबीसी आणि मराठा समाज एकत्र येऊ नये म्हणून सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न डॉ. लाखे पाटील यांनी असेही म्हटले की, सरकार जाणूनबुजून ओबीसी आणि मराठा समाजामध्ये मतभेद निर्माण करण्याचा



प्रयत्न करत आहे. जात पडताळणीच्या नावाखाली समाजातील सौहार्द धोक्यात आणले जात आहे. बावनकुळे यांनी कोणत्या अधिकारातून असे आदेश दिले हे स्पष्ट करावे.

शासनाने समजूतदारपणे निर्णय घ्यावा पत्रकार परिषदेत अखेर डॉ. लाखे पाटील यांनी राज्य सरकारला आवाहन केले की, राज्याच्या वैधानिक रचनेचा भंग करून शासन चालवण्याचा प्रयत्न थांबवावा. कायदा आणि संविधानाचा आदर राखूनच शासन निर्णय घ्यावेत.

# राजेगाव येथील शेतकरी उगले यांच्या उपोषणाला शिवसेनेचा पाठींबा



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील शेतकर्यांची कर्जमाफी व्हावी व मराठवाड्यातील अतिवृष्टीकस्त शेतकर्यांना तात्काळ मदत मिळावी यासह शेतकर्यांच्या विविध मागण्यांसाठी घनसावंगी तालुक्यातील राजेगाव येथील शेतकरी गजानन रामनाथ उगले हे मागील सहा दिवसांपासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करत आहेत.

आज त्यांची भेट घेऊन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या व त्यांच्या उपोषणास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा पाठिंबा दिला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश नळगे, जिल्हासंघटक भानुदास घुगे, किसान सेना संघटक मुरलीआबा थेटे, तालुकाप्रमुख हरीहर शिंदे, संदीप कंटुले, अनंता वैद्य, आबा कदम बाबुराव कायंदे, प्रभाकर उगले, बबनराव मिसाळ यांच्यासह आदीं पदाधिकार्यांची यावेळी उपस्थिती होती.

# सौ शांताबाई आसारामजी अंभुरे यांचे वृद्धापकाळाने निधन



**परतूर प्रतिनिधी -** श्रीष्टी येथील शेतकरी कुटुंबातील सौ शांताबाई आसारामजी अंभुरे यांचे वयाच्या ८५ वर्षी दिनांक ४ ऑक्टोंबर शनिवार रोजी सकाळी नऊ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी नाती नातवंड असा मोठा परिवार असून प्रहार संघटनेचे अशोकराव तनपुरे यांच्या मोठ्या आत्या होत्या.

## जखमी व्यापाऱ्याची आ. लोणीकरांनी घेतली भेट

# जात पात, पक्ष न पाहता मि सदैव हिंदूंच्या पाठीशी

## आमदार बाबनरावजी लोणीकर यांची ग्वाही



**परतूर । प्रतिनिधी -** दसरा या दिवशी फूल फळ विक्रेत्याने निष्पाप व्यापाऱ्यावर हल्ला झाल्याने, उजवा हात व पायाला गंभीर जखमी झालेल्या गोपाळ शर्मा यांची आमदार बबनराव लोणीकर यांनी दवाखान्यात जाऊन भेट घेतले. त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली त्यानंतर त्यांना धीर दिला. यावेळी त्यांनी पत्रकार केदार शर्मा हे माझे परिवाराचे सदस्य आहेत व त्याचे ते भाऊ असल्याचे नंतर कळाले, परंतु सामान्य व्यापारी यांच्या आपण सदैव पाठीशी राहिलो व पुढेही राहू. यातील सर्व हल्लेखोरांचा शोध घेऊन अटक करावी व कडक शासन करावे यासाठी सूचना दिल्याचे सांगितले.

**हिंदूसाठी सदैव रस्त्यावर**

राजकारण करताना मतांसाठी आपणास कधीच केले नाही, जात पात पक्षभेद न पाहता दिन दुबळा दलित यांच्या सोबत आपण खंबीर उभे राहिलो, शहर व तालुक्यात हिंदू म्हणून सदैव सर्वांच्या संकटाच्या काळात आपणास सदैव सोबत राहिलो असल्याचे सांगितले. मी प्रत्येक सज्जन व कट्टर भारतीय माणसाच्या सोबत असून जिहादी वृत्तीला ठेचून काढू असे सांगितले, शहरातील वातावरण गलिच्छ होऊ नये, रस्त्यावरील हातगाडी व स्टॉल कायमस्वरूपी दुसऱ्याठिकाणी हलवावे जेणेकरून सामान्य नागरिक महिला पुरुष व ग्रामस्थांना त्रास होणार नाही.

अधिकाऱ्यांना या बाबत सूचना दिल्या असून हातगाडी चालकविरुद्ध कडक कारवाई कराव्यात असे सांगितले.

यावेळी त्यांच्यासोबत जालना तालुकाध्यक्ष श्री उफाड ,परतुर तालुकाध्यक्ष श्री शत्रुघ्न कणसे, माजी तालुकाध्यक्ष श्री रमेशराव भापकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर श्री योगेश धन्यवाद व त्यांचे स्टाफ मधील डॉक्टर उपस्थित होते.

## संपादकीय

# गुटखा माफियांचा जिल्हा - कायदा कुणाच्या बाजूने?

## कायदा जिवंत ठेवू नका, गुटखा माफिया लालाच्या हाती सोपवा?

जालना जिल्ह्यातील परिस्थिती आज अत्यंत गंभीर आणि चिंताजनक वळणावर आली आहे. शासनाने गुटखा विक्रीवर कडक बंदी लागू केली असतानाही, लाल रंगाचा राजा सतीश उर्फ लाला आणि त्याचे जाळे खुलेआम फोफावत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि पोलिस विभागावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे - गुटखा माफियांना अभय कोण देतंय?

**कायदा झोपतो का हप्त्याच्या झोळीत?**

सामान्य नागरिकांच्या डोळ्यासमोरचा अनुभव भीषण आहे. शाळा-कॉलेज परिसरात गुटखा खुलेआम मिळतो, पोलीस मात्र मुकदर्शक. हप्ता दिला की कायदा झोपतो हे आता केवळ म्हण नाही, तर जालना जिल्ह्याचे वास्तव बनले आहे. लहान दुकानदार, चहा विक्रेते, भाजीवाले यांच्यावर नियमांचे रेटे ओढले जातात; पण गुटखा विक्रेत्यांचे साम्राज्य मात्र पोलिसांच्या नजरेआड राहते. हेच दृश्य नागरिकांच्या मनात रोष आणि अविश्वास निर्माण करते.

**गुटखा - आरोग्य नव्हे, मृत्यूचा व्यापार**

गुटखा हा तंबाखूचा पदार्थ नाही; तो समाजाच्या शरीरात पेरलेले 'मृत्यूचे बीज' आहे. मुखाचा कर्करोग, पचनाचे विकार, दात-हाडांचे आजार - या सगळ्या व्याधींचे मूळ हेच पाउच. हजारो कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. आरोग्य यंत्रणेवर अनंत ताण आहे.

पण प्रश्न असा - जर शासनाने गुटखा बंदी लागू केलीच आहे, तर ती फक्त कागदावर का जिवंत आहे? जमिनीवर तिचा श्वास का थांबलेला आहे?

**प्रशासनाची निष्क्रियता; माफियांचा आत्म विश्वास**

जालना जिल्ह्यातील गुटखा जाळे मोडण्यासाठी कारवाई झालीच नाही असे नाही. पण ती कारवाई क्षणिक, दिखाऊ आणि निवडक. मुख्य माफियापर्यंत पोहोचू नका - असा अदृश्य आदेशच जणू कार्यरत आहे. यातून समाजाला एक भीषण संदेश जातो - कायदा हा सामान्यांसाठी आहे, प्रभावशालींसाठी नाही. ही मानसिकता लोकशाहीच्या मुळावर प्रहार करते. कायद्याची भीती नष्ट झाली की गुन्हेगारी राज्य करते.

**जबाबदारी कुणाची?**

राज्य सरकारच्या गुटखा बंदीच्या आदेशाला स्थानिक प्रशासनाने पायदळी तुडवले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, अन्न व औषध विभाग - या सर्व यंत्रणांनी जर समन्वय साधला असता, तर जालन्यात गुटखा विक्रीला थारा राहिला नसता. मात्र आज वास्तव उलट आहे - गुटखा विक्रेते दिवसाढवळ्या व्यापार करतात आणि पोलिस नजर ठेवत आहोत अशा औपचारिक प्रतिक्रिया देतात.

**उपाययोजना नव्हे, निर्णायक कृती हवी**

आता वेळ आली आहे की राज्य सरकारने विशेष टास्क फोर्स नेमावी. जिल्हा प्रशासनातील दोषींवर सखोल चौकशी व कठोर शिक्षा केली पाहिजे. शाळा-कॉलेज परिसरात 'शून्य सहनशीलता धोरण' लागू करणे अत्यावश्यक आहे. गुटखा माफियांचे आर्थिक स्रोत शोधून जप्त करणे - हीच खरी अंमलबजावणी. अन्यथा हे मृत्यूचे साम्राज्य पुन्हा जनतेवर राज्य करेल.

जालना जिल्ह्याची कथा एका माफियापुरती मर्यादित नाही - ती कायद्याच्या अंमलबजावणीतील निष्क्रियतेची आणि संगनमताची कहाणी आहे. प्रशासनाने आता ठरवावे, कायदा जिवंत ठेवायचा का गुटखा माफियांच्या हाती सोपवायचा? जर राज्याने तातडीने कारवाई केली नाही, तर जालना जिल्हा गुटखा राजधानी बनण्याची भीती आता दूर नाही.

# अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ अभिनेत्री संध्या

आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचे वृद्धापकाळाने ४ ऑक्टोबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली. अभिनेत्री संध्या म्हणजे अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ. २७ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या अभिनेत्री संध्या यांचे पूर्ण नाव विजया श्रीधर देशमुख असे होते. त्यांचे वडील रंगभूमीवरील कलाकार होते. त्यामुळे अभिनेत्री संध्या यादेखील रंगभूमीवर काम करू लागल्या. त्यांच्या मोठ्या भगिनी वत्सला या देखील रंगभूमीवर काम करत असत. अभिनेत्री संध्या यांना लहानपणापासूनच नृत्याची आवड होती त्यामुळे त्या नृत्याचे देखील कार्यक्रम करत असत. याच नृत्याने त्यांना चित्रपट सृष्टीत प्रवेश मिळवून दिला. दिग्दर्शक व्ही शांताराम यांनी अमर भूपाळी या चित्रपटासाठी अभिनेत्री संध्या यांची निवड केली कारण हा चित्रपट तमाशाप्रधान होता. यातील मुख्य नायिका ही तमासगिरीन होती. सहकाजीकच नायिकेला नृत्य कौशल्याची जाण असणे गरजेचे होते. अभिनेत्री संध्या यांच्याकडे नृत्य कौशल्याची चांगली जाण असल्याने त्यांची या चित्रपटासाठी निवड झाली. या चित्रपटातील तमासगिरणीच्या भूमिकेसाठी अभिनेत्री संध्या यांनी खूप कष्ट आणि नृत्याचे धडे गिरवले. त्यांच्या या कष्टाचे चीज झाले. हा चित्रपट खूप गाजला. यातील गाणीही खूप गाजली. त्यानंतर त्यांना परछाई या हिंदी चित्रपटात खलनायिकेची भूमिका मिळाली या चित्रपटात त्यांनी संध्या हे नाव धारण केले पुढे हेच नाव रूढ झाले. झनक झनक पायल बाजे या संगीतप्रधान चित्रपटातही त्यांनी मुख्य नायिकेची भूमिका साकारली. या भूमिकेने त्यांना अनेक चित्रपट मिळवून दिले. तीन बत्ती चार रास्ता, दो आँखें बाराह हात, नवरंग यासारखे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील हिट झाले. नवरंग या चित्रपटातील जा रे जा नटखट.... या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही भूमिका निभावल्या. त्यानंतर त्यांनी स्त्री, सेहरा, लडकी सह्याद्री की, जल बन मछली नृत्य बिन मजली हे त्यांचे चित्रपट देखील गाजले. अभिनेत्री संध्या यांचा सर्वाधिक गाजलेला आणि लक्षात राहिलेला चित्रपट म्हणजे पिंजरा. या चित्रपटात त्यांनी साकारलेली नायिका अजूनही रसिकांच्या मनात घर करून आहे. अभिनय सम्राट निळू फुले, डॉ श्रीराम लागू यांच्यासारखे दिग्गज कलावंत असतानाही अभिनेत्री संध्या यांची भूमिका रसिकांच्या लक्षात राहिली. या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. या चित्रपटाने त्याकाळी विक्रम केला होता. चंदनाची चोळी अंग अंग जाळी हा त्यांचा शेवटचा चित्रपट. हा चित्रपटही गाजला. त्यानंतर मात्र त्यांनी मनोरंजन विश्वातून निवृत्ती स्वीकारली. अभिनेत्री संध्या यांनी राजकमल चित्रपट संस्थेखेरीज इतर कोणत्याही चित्रपट संस्थेच्या चित्रपटात काम केले नाही. शेवटपर्यंत त्या राजकमल आणि व्ही शांताराम यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी व्ही शांताराम यांच्याशी विवाह केला. व्ही शांताराम यांच्या त्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ असलेल्या अभिनेत्री संध्या यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# टेंभुर्णी येथील नरसिंह दुर्गा देवी उत्सव महिला मंडळ कडून देवीचे विसर्जन

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - येथील ब्राम्हण गल्ली तील महाराष्ट्रातून भक्ती भावाचे केंद्र असलेले एकमेव मंदीर असलेले श्री नरसिंह देवाचे मंदिर आहे. येथे सालाबादा प्रमाने या वर्षी ही नवरात्र उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला.

श्री नरसिंह दुर्गा देवी उत्सव महिला मंडळ ब्राह्मण गल्ली यांच्या कडून महिला मंडळ यांनी दहा दिवस जागरण नामस्मरण विविध स्पर्धा घेऊन दहा दिवसांचा चांगला कार्यक्रम संपन्न करून मातेची आराधना पूजा केली.

दसरा सण असल्यामुळे येथे एक दिवस लेट विसर्जन केल्या जाते त्या मुळे काल हे विसर्जन करण्यात आले.या वेळी सर्व महिला मंडळ उपस्थित होते त्यात आशा खांडेभराड विना काबरा सुरेखा काबरा अर्चना मुळे वैशाली मुळे प्राची मुळे मीनाक्षी मुळे विद्या जोशी श्रद्धादेव गीता डहाके दिपाली आवटी कविता अर्चना शर्मा काबरा रुचिता सोमानी ज्योती आमले जयश्री काबरा गंगासागर बारगुडे यांची उपस्थिती होती.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# ग्रामीण भागात बेकायदेशीर प्लॉटिंगचे पेव फुटले

## कुंभार पिंपळगाव व परिसरात जवळपास शंभर कोटींच्यावर बेकायदेशीर प्लॉटींग; प्रशासनाचे दुर्लक्ष!

**जालना । प्रतिनिधी -** घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे गेल्या काही महिन्यांपासून नियम कायद्यांना तिलांजली देत कोट्यवधी रुपयांच्या बेकायदेशीर प्लॉटिंगचे साम्राज्य उभे राहिले आहे. जिल्हा प्रशासन आणि महसूल विभाग यांचे मौन आता संशयास्पद वाटू लागले आहे. प्राथमिक अंदाजानुसार या परिसरात जवळपास शंभर कोटींच्या वर बेकायदेशीर प्लॉटिंग झाल्याचे समोर आले असून, यात ग्रामपंचायत ते रजिस्ट्री कार्यालयापर्यंत संगनमत असल्याचा जनतेत आरोप आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगांव हे जवळपास २० हजार लोकसंख्येचे गांव आहे, येथे मोठी व्यापारीपेठ आहे, शिवाय हे गांव २५ ते ३० गावाचा केंद्रबिंदू आहे. गावातून दोन महामार्ग गेले आहेत. गावाचा चारही बाजूने झपाट्याने विस्तार होत असतांनाच येथे बेकायदेशीर प्लॉटिंगलाही ऊत आले आहे. कुंभार पिंपळगांव व परिसरात जवळपास २५ ते ३० ठिकाणी बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आली आहे. गंभीर बाब म्हणजे अपवाद सोडल्यास कोणीही एन.ए. केलेले नाही अथवा शासनाची परवानगी घेतलेली नाही. सदरील प्लॉटिंगचा आकडा हा १०० कोटींच्या वर असल्याचे दिसत आहे. कुंभार पिंपळगांव व गावालगत कोट्यवधी रूपयांची बेकायदेशीर प्लॉटिंग झाली असून अजूनही सातत्याने प्लॉटिंग सुरूच आहे. गावातून पाचोड-अंबड-घनसावंगी-कुंभार पिंपळगांव-आष्टी हा एक महामार्ग गेलेला आहे तर रांजणी ते कुंभार पिंपळगांव - उक्कडगांव हा दुसरा महामार्ग गेलेला आहे, शिवाय गावातूनच इतर अनेक गावांना सुध्दा छोटे मोठे रस्ते गेलेले आहेत, या प्रत्येक रस्त्यावर नियम कायदे धाब्यावर बसवून २५ ते ३० ठिकाणी कोट्यावधीची बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आली आहे.

जो पर्यंत एन.ए. काढण्यात येत नाही किंवा शासनाच्या विविध परवानग्या घेतल्या जात नाही, तो पर्यंत प्लॉटिंग काढताच येत नाही. हे अधिकारी सुध्दा मान्य करतात. मात्र कुंभार पिंपळगांवात सर्व नियम कायदे धाब्यावर बसवून कोणीही सहज जमिन खरेदी करत आहे आणि उभ्या आडव्या रेषा मारून बेकायदेशीरपणे प्लॉट विक्री करत आहे.

कुंभार पिंपळगावात आणि गावाच्या बाहेरील एकही रस्ता सुटलेला नाही जेथे बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्लॉटिंग काढणारे ठिकठिकाणी जमिनी खरेदी करत असल्याने त्यांच्याकडे एवढा पैसा येतोय कुठून ? ब्लॅक मनीचा वापर होत आहे का ? आणि या प्लॉटिंगला फायनान्सर कोण ? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सदरील बेकायदेशीर प्लॉटिंगला नुकतंच शेतकरी अनुदान घोटाळ्यात निलंबित झालेले कुंभार पिंपळगांवचे ग्राम सेवक (ग्रा.पं.अधिकारी) यांचा विशेष आशीर्वाद लाभला आहे. कारण सर्वात आधी नियमबाह्य प्लॉटिंगच्या प्लॉटची बेकायदेशीर नोंद ग्रामपंचायतला केली जाते. त्यानंतर हे प्लॉट रजिस्ट्री ऑफीस मध्ये चहापानी करून नोंद केले जातात. कारण ग्रामपंचायतला नोंद केल्यानंतरच रजिस्ट्रीची प्रक्रिया पुढे राबवली जाते. म्हणजे सुरूवात ग्रामपंचायत पासूनच होते.

कुंभार पिंपळगाव व परिसरात जवळपास १०० कोटीची बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आलेली आहे. या बेकायदेशीर प्लॉटिंगची जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुद्रांक जिल्हाधिकारी, बीडीओ चौकशी करणार का? दोषींवर कारवाई करणार का? असा सवाल जनतेतून विचारला जात आहे.

या प्रकरणावर तातडीने सखोल चौकशी होऊन बेकायदेशीर प्लॉटिंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल व्हावेत, रजिस्ट्री कार्यालयातील अधिकारी तपासले जावेत, आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई व्हावी, अशी नागरिकांची मागणी आहे. कायद्याला वळसा घालणारे हात जर आज पकडले नाहीत, तर उद्या संपूर्ण ग्रामीण भाग दलालांच्या ताब्यात जाईल.

**घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव व परिसरात शंभर कोटी रुपयांहून अधिक बेकायदेशीर प्लॉटिंग होत असल्याचे सत्य उजेडात आणणाऱ्या पत्रकारांवर दबाव व धमक्यांचे सत्र सुरू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकारांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून पत्रकारांना तात्काळ संरक्षण द्यावे, अशी मागणी विविध संघटना आणि नागरिकांकडून केली जात आहे.**

### रजिस्ट्री ऑफीसची भूमिका संशयास्पद !

सदरील बेकायदेशीर प्लॉटिंगवाले ग्रामपंचायत स्तरावर प्लॉटची नोंद केल्यावर रजिस्ट्री ऑफीस (दुय्यम निबंधक कार्यालय) येथे प्लॉटची रजिस्टी करून देत आहेत. रजिस्ट्री ऑफीसला साधारणपणे कोणीही विचारणा केल्यास रजिस्ट्री बऱ्याच दिवसापासून बंद असल्याचे सांगितले जाते, परंतू अंधारातून घेणं-देणं करून कार्यक्रम फत्ते केला जात आहे. विशेष म्हणजे अनेकदा संबंधित अधिकारी २ / ४ दिवस सुट्टीवर गेल्यावर त्या काळात मोठ्या प्रमाणात रजिस्ट्री होत असल्याचे सुत्रांनी सांगितले.






# आत्मविश्वास, इच्छाशक्ती, कठोर परिश्रमाची तयारी ठेवा, यश हमखास मिळेल

## आमदार नारायण कुचे यांचा इयत्ता दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना सल्ला

**जालना । प्रतिनिधी -** आत्मविश्वास, इच्छाशक्ती, कठोर परिश्रमाची तयारी व अभ्यासात सातत्य ठेवा, यश हमखास मिळेल, असे प्रतिपादन आमदार नारायण कुचे यांनी व्यक्त केले. जालना शहरातील पाठक लॉन्सवर रविवारी सकाळी जालना जिल्हा चर्मकार समाजातर्फे इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचे उदघाटक म्हणून ते बोलत होते. प्रारंभी दीपप्रज्वलन करत महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना शहर मनपा आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर तर प्रमुख अतिथी म्हणून कल्याण डोंबीवली मनपा उपायुक्त वंदनाताई गुळवे, प्राचार्य डॉ. गणेश भुगरे, प्रा. डॉ. युवराज गहेराव, शिक्षक रोहिदास शिखरे होते. तर मार्गदर्शक म्हणून बुलढाणा येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे व बदनापूर येथील रावसाहेब पाटील दानवे कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. ललीता भुगरे-आक्षेय होत्या. आ. कुचे म्हणाले, इयत्ता दहावी, बारावी, पदवीनंतर करीअरची निवड करताना केवळ प्रशासकीय सेवाच नव्हे तर उद्योग-व्यवसाय, राजकारणातही भरपूर संधी उपलब्ध आहेत, सर्वांसाठी ही क्षेत्रे खुली आहेत. त्यामुळे आपले ध्येन निश्चित करून त्या दिशेने मार्गक्रमण करा, तुम्हाला यश नक्कीच मिळेल. उपायुक्त गुळवे यांनी मुलगी शिकली तर घर-कुटूंब नव्हे तर समाजाचा, देशाचा ती भक्कम आधार बनू शकते असे स्वानुभव सांगत मुलींना भरपूर शिकवून स्वावलंबी बनवण्याचे आवाहन त्यांनी पालकांना केले. प्राचार्य डॉ. भगुरे यांनीही गुणवंतांना सर्वत्र विपूल संधी असल्याचे नमुद केले. यावेळी त्यांनी विज्ञानातील विविध



दाखले देऊन शिक्षणाचे महत्व सांगितले. शिक्षक शिखरे यांनी शालेय शिक्षणाचे महत्व पटवून देत यात पालकांची भूमिका विषद केली. प्राचार्या भुगरे-आक्षेय यांनी मोबाईल, एआय यासारख्या नवतंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बन्सीदास ढवळे, सुत्रसंचालन प्रा. जया वडोदे-डोंगरे तर उपस्थितांचे आभार सचिन इरछे यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

प्रशासकीय सेवेतून समाजाची सेवा करता येते

विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून प्रशासकीय सेवत यावे जेणेकरून समाजाची सेवा करता येईल, गोर-गरीब, गरजूंना मदत करता येईल. प्रत्येकाला कामानिमित्त प्रशासकीय अधिकार्यांकडे यावेच लागते, त्यांच्या स्वाक्षरीला महत्व आहे. यामुळे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी बना आणि आपल्या समाजाची सेवा करण्याचा सल्ला प्रा. डॉ. गहेराव यांनी दिला.

नीट, जेईई परीक्षेची तयारी करणार्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून यातून प्रचंड स्पर्धाही निर्माण होत आहे. मात्र, आपली आवड, अंगभूत क्षमता व भविष्यातील संधी लक्षात घेऊन क्षेत्र निवडले तरच भरघोस यश मिळू शकते, यामुळे कुणाच्या सांगण्यावरून नव्हे तर स्वत:च्या क्षमता ओळखून करीअर निवडा असा सल्ला दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे यांनी दिला.

# राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सलोखा विषयावर विशेष व्याख्यान




**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सलोखा या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी भूषविले. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. बी.बी.चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. आपल्या प्रभावी भाषणात त्यांनी भारतातील विविधता, एकता आणि सामाजिक सलोखा यांचे महत्व विशद केले. त्यांनी विद्यार्थ्यांना समाजात ऐक्य, सद्भावना आणि सहिष्णुता वाढविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम आधिकारी प्रा. डॉ.जगतवाड एस.पी. यांनी केले तर भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजसेवेत सक्रिय सहभाग घेण्याचे महत्व स्पष्ट केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील , एनएसएस स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सरिता मनियार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.प्रदीप मिसाळ यांनी केले. कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

**झाडे लावा झाडे जगवा**